# भंडारा जिल्ह्यात क्रीडा क्षेत्रातील योगदान व महत्व

प्रा. मोरेश्वर काशिनाथ मडावी
शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख
डॉ. अरुण मोटघरे महाविद्यालय
कोंढा कोसरा ता.पवनी जि.भंडारा

**सारांशः—**

भंडारा जिल्ह्यात क्रीडा क्षेत्राला समृध्दपणे वारसा लाभला असून स्थानिक खेळाडूंना राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर जिल्ह्याचे नाव उज्ज्वल केले आहे. भंडारा जिल्ह्यातील क्रीडा क्षेत्रातील योगदान पायाभुत सुविधा, जलक्रीडा (Water Sports), विविध क्रीडा प्रकारात बॉस्केटबॉल, कबड्डी, खो—खो, हॉकी व रनिंग ट्रॅक इत्यादी खेळांना विशेष महत्व दिले जातात. त्याचप्रमाणे शासकीय प्रोत्साहन जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयामार्फत खेळाडूंना आरक्षण, गुण सवलत, मानधन आणि ग्रामीण भागातील संस्थाना समाजसेवा शिबिरांसाठी वित्तीय सहाय्य पुरवले जातात. यादृवारे क्रीडा क्षेत्रातील महत्वामध्ये सर्वांगीण विकास, युवा सक्षमीकरण, सामाजिक एकता वाढण्यास मदत होत.

## प्रस्तावना :—

भंडारा जिल्हा पितळ साठी प्रसिध्द आहे आणि जिल्ह्याला ‘पितळ शहर’ नावाने ओळखले जाते. भंडारा जिल्हा हा झिलसाठी प्रसिध्द असून घ्या जिल्हाला झिलाचा जिल्हा म्हणून ओळखले जाते. भंडारा शहर वैनगंगा आणि सुर नदिच्या मध्ये आहेत. भंडारा जिल्ह्यामध्ये पारंपारिक खेळापासून आधुनिक खेळापर्यंत विविध प्रकाराचे खेळ खेळले जातात. जिल्ह्याच्या ग्रामीण भागात आजही दुर्मिळ पारंपारिक खेळ जिवंत आहेत. तर शहरात आधुनिक सुविधांसह विविध स्पर्धाचे आयोजन केले जातात.

भंडारा जिल्ह्यातील क्रीडा क्षेत्रांचे योगदान हे केवळ पदके मिळवण्यापुरते मर्यादित नसून, ते शारिरीक, मानसिक सदृढता व शिस्तबद समाज युवक सक्षमीकरणाचे साधन आहे. जिल्ह्याच्या प्रशासनाकडून उपलब्ध करुन देण्यात आलेल्या पायाभूत सुविधा, ‘छत्रपती शिवाजी महाराज जिल्हा क्रीडा संकुल’ यासारखी नवी केंद्रे आणि शासनस्तरावरुन प्राप्त असलेल्या शासकिय योजनामुळे खेळाडूंना नविन दिशा व मार्ग मिळाले आहेत.

## पायाभूत सुविधा आणि विकासः—

भंडारा, पवनी आणि केसलवाडा यांसारख्या तालुक्यांमध्ये क्रीडागंणांचे आधुनिकीकरण करुन आंतराष्ट्रीय दर्जाच्या सोयीसुविधा निर्माण करण्यावर भर दिला जात आहे. यामध्ये बॉस्केटबॉल, हॉकी, रनिंग ट्रॅक, फुलबॉल, बॅडमिंटन, वॉटर स्पोर्टस यांसारख्या खेळांसाठी विशेष सुविधा आहेत.

## पारंपारिक खेळाचे जतनः—

जिल्हात ग्रामीण सांस्कृतीचे दर्शन घडवणाऱ्या शंकरपट (बैलगाडी शर्यत) सारख्या पारंपारिक खेळांना विशेष महत्व दिले जाते. तसेच पवनी तालुक्यात दांडपट्टा, तलवारबाजी व लाठीकाठी इत्यादी खेळांना विशिष्ट प्रोत्साहन दिले जातात.

## जिल्हा क्रीडा संकुलः—

'छत्रपती शिवाजी महाराज जिल्हा क्रीडा संकुल' हे जिल्हातील खेळाडूच्या प्रशिक्षणाचे मुख्य केंद्र आहे. येथे राज्यस्तरीय, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळणाऱ्या खेळाडूंना गौरव करुन नविन पिढीला प्रेरणा दिली जाते.

## भंडारा जिल्ह्यात क्रीडा क्षेत्राचे योगदान व महत्व खालीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

- **क्रीडा क्षेत्रातील प्रमुख योगदानः—**

**१. आधुनिक क्रीडा संकुलेः—**

पवनी आणि भंडारा सारख्या तालुक्यांमध्ये बॉस्केटबॉल, फुलबॉल, बॅडमिंटन, बास्केटबॉल, व्हॉलीबॉल, टेबल टेनिस, तीरंदाजी यासारख्या खेळांसाठी अत्याधुनिक मैदान निर्माण करण्याचे काम वेगाने सुरु आहे.

**२. स्थानिक खेळाचे जतनः—**

कबड्डी, खो—खो, हॉकी व व्हॉलीबॉल यांसारख्या पारंपरिक खेळांना प्रोत्साहन देण्यासाठी विशेष स्पर्धाचे आयोजन मंडळ व शासकिय स्तरावरुन करण्यात येते.

**३. शासकिय प्रोत्साहनः—**

राज्यशासनाच्या क्रीडा धोरणानुसार विविध खेळात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना शिष्यवृत्ती आणि नौकरीची संधी उपलब्ध होण्यास मदत होत असते.

**४. सांस्कृतीक व क्रीडा महोत्सवः—**

जिल्हा परिषद, शासनातर्फे व विद्यापीठामार्फत विद्यार्थ्यांसाठी, कर्मचारी व अधिकारी यांच्यासाठी विविध सांस्कृतीक व क्रीडा महोत्सव मार्फत स्पर्धाचे आयोजन केले जाते. ज्याद्वारे जिल्हातील क्रीडा संस्कृती जोपासण्यास सहकार्य होते.

- **क्रीडा क्षेत्राचे महत्वः—**

## १. पायाभूत सुविधांचा विकासः—

जिल्ह्यामध्ये खेळाडूंना आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी तालुका आणि जिल्हा स्तरावर क्रीडा संकुलांचे आधुनिकीकरण केले जात आहे. यामध्ये स्विमिंग पूल, रनिंग ट्रॅक आणि विविध खेळांसाठी स्वतंत्र मैदाने विकसित केली जात आहे.

## २. ग्रामिण क्षेत्रातील प्रतिभेला वावः—

भंडारा जिल्ह्यातील ग्रामीण भागातील खेळाडूंना दर्जेदार प्रशिक्षण देऊन त्यांना राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर चमकण्याची संधी उपलब्ध करण्यास मदत केली जातात.

## ३. सर्वांगीण विकासः—

क्रीडा स्पर्धामुळे केवळ खेळाडूंचा शारीरिक आरोग्यच सुधारत नाही तर मानसिक स्थिरता सुधाण्यास मदत होइल. ज्यामुळे खेळाडूंमध्ये संघभावना, शिस्त आणि जिद्द निर्माण होण्यास मदत होते. तसेच हे सामाजिक विकासासाठी महत्वाचे आहे.

- **पारंपरिक व स्थानिक खेळः—**

होळीच्या सणात ग्रामीण भागात घानमाकड (कुरकुंजा) विशेषतः आदिवासी विद्यार्थांमध्ये हा खेळ लोकप्रिय आहे. पळसाच्या झाडाच्या लाकडापासून बनवलेल्या साधनावर हा खेळ खेळला जातो. शिवजयंती व इतर सांस्कृतिक उत्सवांच्या वेळी मर्दानी खेळांचे प्रदर्शन केले जाते. ग्रामीण आणि शहरी भागात लोकप्रिय असलेले खो—खो व कबड्डी पारंपारिक मैदानी खेळ खेळले जातात.

- **आधुनिक व शालेय क्रीडा प्रकारः—**

खेलो इंडियामध्ये तलवारबाजी प्रशिक्षण केंद्रामुळे जिल्ह्याने राष्ट्रीय स्तरावर अनेक खेळाडू दिले आहेत. भंडारा जिल्ह्यात वैनगंगा नदीवर कॅनोईंग, कायकिंग आणि ड्रॅगन बोट. यासारख्या जलक्रीडा स्पर्धाचे आयोजन करण्यात येत असतात. त्याचप्रमाणे मैदानी खेळात बॉस्केटबॉल, फुलबॉल, बास्केटबॉल, व्हॉलीबॉल, हॅण्डबॉल आणि धावणे व इंडोर गेममध्ये बॅडमिंटन, टेबलटेनिस आणि स्केटिंग इत्यादी प्रकारचे खेळ खेळविले जातात.

## निष्कर्षः—

भंडारा जिल्ह्यातील खेळांचा निष्कर्षामधून असे दिसून येते की, येथे पारंपारिक ग्रामीण खेळांपासून ते आधुनिक शालेय आणि व्यावसायिक स्तरावरील खेळांपर्यंत मोठी विविधता दिसून येते. ज्यामध्ये पारंपारिक ग्रामीण खेळ, हंगामी खेळ, शालेय आणि व्यावसायिक क्रीडा इत्यादी स्पर्धाचे आयोजन होऊन खेळाडूंना विविध स्तरावर भाग घेऊन राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर जाण्यास मदत होते. ज्यामध्ये क्रीडा संकुलनाचा पायाभूत सुविधा महत्वाची भुमिका निभावते. भंडारा जिल्ह्यातील क्रीडा शिक्षक व प्रशिक्षक यांच्या द्वारे मिळणारे प्रशिक्षण यामुळे क्रीडा संस्कृतिची वाढ होण्यास मदत होत आहे.

## संदर्भः—


- भंडारा जिल्हा माहिती पुस्तक
- भंडारा जिल्हा क्रीडा माहिती पुस्तक
- जिल्हा क्रीडा कार्यालय भंडारा
- http://www.bhandharasports.com